# श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,

## कारंजा (लाड), जि.वाशिम

## (वाणिज्य विभाग)

## वार्षिक अहवाल (२०१९—२०२०)

सत्र २०१९—२०२०मध्ये बी.कॉम. भाग— १ला वाणिज्य शाखेत १०६विद्यार्थ्यांना प्रवेश समितीच्या डॉ.बलजित कौर ओबेरॉय यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आला. तसेच बी.कॉम.भाग—२ मध्ये ६६ व बी.कॉम.भाग—३ मध्ये ४४ अशा एकूण २१६ विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेत पद्वीस्तरावर प्रवेश घेतला.

वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र २०१९—२० चे वाणिज्य विभागासाठी वार्षिक नियोजन करण्यात आले. त्यामध्ये वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठण, वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन, शैक्षणिक व औद्योगिक सहलीचे आयोजन, बॅक व्हिजीट, गेस्ट लेक्चर, इत्यादीचे आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

दिनांक २३/०८/२०१९ रोजी वाणिज्य अभ्यास मंडळाचे गठण वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.दिनेश रघुवंशी यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.

वाणिज्य फोरमच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य भाग—३ चा विद्यार्थी आशिष परमेश्वरराव मानकर याची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी—वाणिज्य भाग—३ ची विद्यार्थ्यीनी कु. रविना शेषराव कोपरकर हिची निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी—वाणिज्य भाग—२ची विद्यार्थ्यीनी कु.दर्शिका आनंदराव राऊत, हिची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून वाणिज्य भाग—१ चे विद्यार्थी प्रज्वल खरडकर, स्वप्नील चौकशे, कु.साक्षी वडयाळकर, कु. अबोली नेमाने व कु. स्नेहल शिरसाठ यांची निवड करण्यात आली.

दिनांक ४ सप्टेंबर २०१९ रोजी, कॉमर्स फोरमचे उद्घाटन संपन्न झाले. अध्यक्षस्थानी कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे, उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री प्रमोद चव्हान तर प्रमुख वक्ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाचे वाणिज्य व व्यवस्थापन परिषदेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. दिनेश निचित उपस्थित होते.

दिनांक २१सप्टेंबर २०१९ रोजी डॉ.मनीष दुबे, व्यवस्थापक, रायसोनी ग्रुप यांचे‘‘**आजची शिक्षण पध्दती आणि रोजगाराच्या संधी**’’या विषयावर वाणिज्य फोरम तर्फे व्याख्यान आयोजित केले होते.

दिनांक २१ सप्टेंबर २०१९ रोजी वाणिज्य भाग—२ च्या सेमिस्टर—३, मधील अभ्यासक्रमात असलेल्या अंकेक्षण (Auditing) या विषयासंबंधीची शैक्षणिक भेट ‘भुतडा आणि गटागट (C. A.)firm’, कारंजा (लाड) येथे आयोजित केली होती.

या मध्ये विद्यार्थ्यांना व्यापाऱ्यांचे, शैक्षणिक संस्थेचे, विमा कंपनीचे व बॅकेचे तसेच इतर संस्थांचे प्रत्यक्ष अंकेक्षण कसे केले जाते या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी कॉर्मस् फोरम तर्फे पुणे येथील C. A.राजेद्र डांगी यांचे,‘‘**पदवीनंतर रोजगारांच्या संधी**’’या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दिनांक ४ जानेवारी २०२० रोजी वाणिज्य फोरम तर्फे MIDC महाड जिल्हा रायगड येथील, ‘‘**सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड**’’ या उद्योगाला भेट देण्यात आली. या उद्योगामध्ये शेतीतील पिकांवर फवारल्या जाणाऱ्या वेगवेगळया केमिकल्सचे उत्पादन करण्यात येत असून त्यांची विक्री भारतीय बाजारपेठेत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत करण्यात येते व यासाठी लागणारा कच्चामाल विदेशातून मोठया प्रमाणात मागविण्यात येतो असे व्यवस्थापक श्री राठी यांनी सांगीतले. या सोबत विद्यार्थ्यांनी रायगड, प्रतापगड, या इतिहासकालीन किल्यांना भेट दिली. तसेच महाबळेश्वर येथील प्रसिध्द मंदीर व निसर्गरम्य परिसराला देखील भेट दिली. या शैक्षणिक व औद्योगिक सहलीमध्ये कॉमर्स फोरमचे ४०विद्यार्थी सहभागी झाले होते.

**विभाग प्रमुख**

**(डॉ.दिनेश रघुवंशी)**

# Photos of Programme






# शिक्षणात आमुलाग्र बदल करण्याची गरज : डॉ. मनीष दुबे

◆ **कारंजा लाड, २४ सप्टेंबर**

येथील कि. न. महाविद्यालयात वाणिज्य अभ्यास मंडळ व सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आजची शिक्षण पध्दती व रोजगारसंधी या विषयावर कला व वाणिज्यच्या विद्यार्थ्यांकरिता व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी बोलतांना रायसोनी गृप इंदौरचे ट्रेनर डॉ. मनीष दुबे यांनी आजच्या शिक्षण पद्धतीत व शिक्षणात अमुलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी, वरिष्ठ प्राध्यापक राजेंद्र बाकल, डॉ. उंबरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व प्रथम विद्यार्थ्यांनी स्वतःला ओळखले पाहिजे. तसेच आजची शिक्षण पद्धती ही फक्त डिग्री मिळविण्यापुरतीच असून, यामध्ये अमुलाग्र बदल होणे अपक्षित आहे. शिवाय त्यांच्यामध्ये आत्मविश्वास कसा वाढविता येईल या सोबतच विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पहावीत, तसेच ते स्वप्न पूर्ण करण्याकरिता अहोरात्र परिश्रम करण्याची तयारी असली पाहिजे. यातुनच जीवनाचे उद्दिष्ट गाठता येईल, असे मत पुढे बोलतांना डॉ. दुबे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी व कला वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

Scanned with CamScanner

## Photos of Programme






## News of Programme

सकाळ

# गोयनका महाविद्यालयात 'रोजगाराच्या संधी' या विषयावर व्याख्यान




कारंजा, ता. ४ : स्थानिक श्री.किसनलाल नथमल गोयनका महाविद्यालयात वाणिज्य विभागतर्फे 'रोजगाराच्या संधी' या विषयावर पुणे येथील आर. डी. इंस्टीटयुट ऑफ अकाऊन्टस आणि टॅक्सेशनचे संस्थापक व संचालक सी. ए. राजेंद्र डांगी यांचे व्याख्यान वाणिज्यच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. विनय कोडापे तर विभाग प्रमुख डॉ. दिनेश रघुवंशी, प्रा. घननीळ गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सी. ए. राजेंद्र डांगी यांनी सांगितले की वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मोठ मोठया कंपन्या, लघु उद्योग, एकल व्यापारी, मॉल्स यांना आता त्यांना अकाऊटंटची गरज भासत आहे व ही गरज फक्त वाणिज्यचे विद्यार्थीच पूर्ण करु शकतात. तसेच छोट्या छोटया व्यवसायाला देखील लेखे लिहावेच लागतात, पैशाचा हिशेब ठेवावा लागतोच. तसेच विमा कंपन्यांचे लेखे, इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करने, जी.एस.टी. फाईल करणे यासाठी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांचीच गरज असते. त्यामुळे कॉमर्स हे खूप मोठे क्षेत्र असून त्यामुळे दरवर्षी लाखो लोकांची मागणी वाणिज्यच्या क्षेत्रातून वाढता आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी पदवी घेतल्यानंतर असा कोर्स करायला पाहिजे की ज्यामध्ये त्यांचा वेळ, पैसा आणि नोकरीच्या संधी उपलब्ध राहील. कार्यक्रमाचे संचालन समन्वयक डॉ. बलजित कौर ओबेरॉय यांनी केले. या कार्यक्रमाला वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कि . न . गोयनका महाविद्यालयात 'रोजगाराच्या संधी' विषयावरील व्याख्यानाला विदयार्थ्यांचा प्रतिसाद




**कारंजा (साप्ताहिक कारंजा सामना प्रतिनिधी)** - स्थानिक श्री किसनलाल नथमल गोयनका महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे 'गेल्या फेब्रुवारीला रोजगाराच्या संधी ' या विषयावर पूणे येथील आर . डी . इंस्टीटयुट ऑफ अकाऊन्टस आणि टॅक्सेशनचे संस्थापक व संचालक चार्टड अकाऊंटंट राजेंद्र डांगी यांचे व्याख्यान वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ . विनय कोडापे तर विभाग प्रमुख डॉ दिनेश रघुवंशी ; प्रा . घननीळ गजभीये यांची प्रमुख उपस्थिती होती . विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना राजेंद्र डांगी यांनी सांगितले की वाणिज्यच्या विदयार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत . मोठ मोठया कंपन्या , लघु उद्योग , एकल व्यापारी , मॉल्स यांना आता त्यांना अकाऊटंची गरज भासत आहे व हि गरज फक्त वाणिज्यचे विद्यार्थीच पूर्ण करु शकतात . तसेच छोटया छोटया व्यवसायाला देखील लेखे लिहावेच लागतात , पैशाचा हिशेब ठेवावा लागतोच . तसेच विमा कंपण्याचे लेखे , इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करने , जी . एस . टी फाईल करणे यासाठी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांचीच गरज असते . त्यामुळे कॉमर्स हे खुप मोठे क्षेत्र असून त्यामुळे दरवर्षी लाखो लोकांची मागणी वाणिज्यच्या क्षेत्रातुन वाढता आहे . यासाठी विद्यार्थ्यांनी पदवि घेतल्यानंतर असा कोर्स करायला पाहीजे की ज्यामध्ये त्यांचा वेळ , पैसा आणि नौकरीच्या संधी उपलब्ध राहील , कार्यक्रमाचे संचालन समन्वयक डॉ बलजीत कौर ओबेरॉय यांनी केले या कार्यक्रमाला वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थी बहुसंख्येने